# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in


क्र:–तंशिस/प्राकाना/ईबीसी/२०१३/2909

दिनांक :– 26 AUG 2013

प्रति,

प्राचार्य/संचालक,

———————————

———————————

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:– **ई.बी.सी. व अल्संख्याक शिष्यवृत्ती प्रशिक्षणाबाबत.**

संदर्भ:– तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३३/१००, दि. २३/०८/२०१३

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासुन **आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या (ई.बी.सी.)** शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबतची प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. तसेच **अल्पसंख्याक शिष्यवृत्तीबाबतची** प्रक्रिया दरवर्षीप्रमाणे ऑन लाईन पध्दतीने राबवण्यिात येते. त्याकरीता व्यावसायीक पदवी व पदव्युत्तर पदवी व पदवीका अभ्यासक्रम राबविणा–या संस्थाकरीता एक दिवसाचे प्रशिक्षण कार्यक्रम **दिनांक ०४/०९/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनियरींग, मंगलवारी बाजार, सदर, नागपूर** येथील ऑडिटोरिम हॉलमध्ये आयोजित करण्यात आले आहे.

त्याकरीता आपल्या संस्थेतील संबंधीत काम बघणारे **एक अधिकारी/कर्मचारी** यांस सदर प्रशिक्षणास उपस्थित राहण्याकरीता प्रतिनियुक्त करावे. **ई.बी.सी. सवलत ही प्रथमच ऑनलाईन पध्दतीने राबविल्या जात असल्याने न चुकता सदर प्रशिक्षण उपस्थित राहावे.** सदर प्रशिक्षण घेण्याकरीता तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित राहणार आहे.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत:– १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता
२. प्रोग्रामर हेच कार्यालय यांना सदर पत्र कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता

D:\EBC\EBC-2013-14 Main Folder\EBC General Letter.doc